प्रशासकीय मान्यता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर या संस्थेच्या जिमखाना इमारतीवर एक मजला लेक्चर हॉल बांधकाम

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जीसीएल-२०१९/प्र.क्र.१११/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन गो.ते.संकुल इमारत,

९ वा मजला, नविन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४००००१.

दिनांक : २७ जून २०१९.

वाचा : संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक संवैशिवसं/शावैमल/बांधकाम/जिमएकमजलालेक्चरहॉल/२२६८९/प(आय)/११५१७/१८, दि. ३०.१०.२०१८.

शासन निर्णय :

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर या संस्थेच्या जिमखाना इमारतीवर एक मजला लेक्चर हॉल बांधकाम करण्याबाबत खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेल्या एकूण रुपये ४१७.५७ लक्ष (अक्षरी रुपये चार कोटी सतरा लक्ष सत्तावन्न हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सार्वजनिक बांधकाम विभागाने सहमती दर्शविलेली रक्कम रुपये
१.	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातूर या संस्थेच्या जिमखाना इमारतीवर एक मजला लेक्चर हॉल बांधकाम करण्याबाबत.	४,८१,२७,४४५	४,१७,५७,०००
	एकूण	**४,८१,२७,४४५**	**४,१७,५७,०००**

अटी व शर्ती :-

१. ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदींबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

२. तांत्रिक मंजूरी देताना राज्य दरसूचीबाह्य बाबींच्या दराकरीता शासन परिपत्रक क्रमांक - २०१७/ प्र.क्र.११/ नियोजन-३, दिनांक ११.४.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दिनांक २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

४. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक : इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क्र.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

६. विषयांकित कामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यक लागणार नाही, याद्दष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

७. कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अभियंता/अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना संबंधीत संस्थेच्या अधीष्ठाता यांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

८. कामासाठी जागेची उपलब्धता, जागा पुरेशी आहे किंवा नाही, याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

९. संबंधित संस्थेच्या अधिष्ठातांनी या विभागाचे शासन परिपत्रक, दिनांक ७.२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

२. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधीची तरतूद झाल्यानंतर सदर काम हे खाली नमूद केलेल्या लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

मागणी क्रमांक - एच-८
४२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३, वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन,
१०५-विषमचिकित्सा पंचवार्षिक योजनांतर्गत
(४२१० ००४१) ५३- मोठी बांधकामे

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात

आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३३/इमा-३, दिनांक २६.०६.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२७१६५२४७४४१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.06.27 17:04:24 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, लातूर
४) सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-३) मंत्रालय, मुंबई.
५) कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर
७) निवडनस्ती (प्रशा-१)